RNI NO. MAHMUL/2010/34781

ISSN [illegible]

# शोध सं[illegible]

आंतरराष्ट्रीयस्तरीय प्रतिष्ठित संशोधन नियतकालिक

वर्ष ६ वे.

फेब्रुवारी ते एप्रिल २०१६

अंक २३ वा.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, D[illegible] Dist.Nanded

संपादक

डॉ. राजशेखर सोलापुरे

Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded

RNI NO. MAHMUL/2010/34781 ISSN 2230-8024

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

# शोध संपदा

## SHODH SAMPADA

आंतरराष्ट्रीयस्तरीय प्रतिष्ठित संशोधन नियतकालिक

वर्ष ६ वे, फेब्रुवारी ते एप्रिल २०१६
अंक २३ वा

: संपादक :
डॉ. राजशेखर सोलापुरे

: सहसंपादक : डॉ. विश्वाधार देशमुख
: उपसंपादक : प्रा. डॉ. शैलजा बरुरे
: संपादन सहाय्यक : प्रा.डॉ.सुनिल पुरी

: संपादकीय सल्लागार मंडळ :
खा. डॉ. जनार्दन वाघमारे, राजन खान, डॉ. अरुणचंद्र शं. पाठक
प्रा. गंगाधर हिंगोले, प्रा. भास्कर चंदनशिव, प्राचार्य डॉ. विठ्ठल मोरे
डॉ. बाबुराव गुरव, प्राचार्य. डॉ. नागोराव कुंभार, सु.ग.जोशी
डॉ. वीरण्णा राजूर, डॉ. सूर्यकांत घुगरे, डॉ. के.बी.कनकुरे, प्रा. ओमप्रकाश होळीकर

: वितरक : प्रा. राजकुमार बिरादार
: जाहिरात प्रमुख : सुशिल कोरे

: संपादकीय पत्रव्यवहार :
डॉ. राजशेखर सोलापुरे
संत ज्ञानेश्वर नगर, रिंग रोड जवळ, लातूर
मो.नं. 09423345822
Email-rajshekhar.solapure@gmail.com

| | वार्षिक वर्गणी | त्रैवार्षिक वर्गणी |
|---|---|---|
| ■ व्यक्ती | ४०० रु. | ८०० रु. |
| ■ संस्था | ५०० रु. | १००० रु. |

■ अंकाचे मूल्य - १२० रु.

■ शोध संपदा या त्रैमासिकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मताशी मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक व वितरक सहमत असतीलच असे नाही.

■ शोध संपदा हे त्रैमासिक मुद्रक, मालक, संपादक, प्रकाशक सोलापुरे राजशेखर शशिकांत यांनी प्रवर्तन ऑफसेट प्रिंटर्स, संत ज्ञानेश्वर नगर, रिंग रोड जवळ, लातूर महाराष्ट्र येथे छापून तेथेच प्रकाशित केले आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

७. आत्मचरित्र वाङ्मयप्रकार : संकल्पना, स्वरूप, वैशिष्ट्ये

प्रा. डॉ. व्यंकटी नागरगोजे ..........

❁ समीक्षेचा परिप्रेक्ष्य ❁

८. नरेश मेहता के काव्य में मिथकीय योजना

डॉ. मोहन शिंदे ..........

९. नेणीवेच्या जाणीवेची कविता

प्रा.डॉ. जयद्रथ जाधव..........

❁ मूल्यात्मकता ❁

१०. महात्मा बसवेश्वरांची आर्थिक समतेची संकल्पना : एक पुनर्मूल्यांकन

प्रा. डॉ. रत्नाकर लक्षटे ..........

❁ तत्त्वचिंतन ❁

११. आद्य श्री गुरूग्रंथ साहेबांचे तत्वज्ञान

डॉ. गणेश बेळंबे ..........

❁ व्यक्तीविचार ❁

१२. स्वामी रामानंद तीर्थ यांचे शिक्षणविषयक विचार आणि कार्य

सविता एस. बुरांडे ..........

❁ शासन - प्रशासन ❁

१३. मानवी मूल्ये आणि प्रशासन

प्रा. डॉ. स्मिता खानापुरे ..........७[illegible]

❁ उपेक्षितांचा विचार ❁

१४. आदिवासी स्त्रीयांच्या शाश्वत विकासासाठी प्रशासन करीत असलेल्या प्रयत्नाचा आढावा

डॉ.संतोष कुऱ्हे ..........७७

Adarsh Vyapari Education Society's Degloor College Degloor Dist.Nanded

# १०. महात्मा बसवेश्वरांची आर्थिक समतेची संकल्पना : एक पुनर्मूल्यांकन

प्रा. डॉ. रत्नाकर लक्षटे, देगलूर

१२ व्या शतकाच्या सुरुवातीस दक्षिण भारतामध्ये बसवेश्वर मादरस नावाच्या महात्म्याचा जन्म झाला. त्याकाळात भारतामध्ये मनुस्मृतीप्रणीत वैदीक समाजव्यवस्था उदयास आली. ती व्यवस्था आपल्याला मान्य असो कि नसो, ती योग्य असो की नसो पण व्यापक चर्चाविश्वाचा भाग म्हणून ती आपल्याला अपरिहार्यपणे स्वीकारावी लागते. कारण ती बसव युगाची व्यवस्था होती. या व्यवस्थेची आपण प्रतारणा केली तर बसव तत्वाच्या चर्चाविश्वामध्ये आपणच अप्रस्तुत होण्याची शक्यता असते. महात्मा बसवेश्वरांसारख्या दिव्य वलयी व्यक्तिमत्वाचा आणि त्यांच्या गतिमान विचारांचा वेध घेताना समकालीन युगाच्या व्यवस्थेचा आवाज ऐकावाच लागेल.

बसवेश्वरांच्या काळात विचारसरणचे युग संपले होते. परिवर्तनवादी चळवळींना ओहोटी लागली होती. पुरोगामी विचारावर आधारीत राजकारण व संघटना अप्रस्तुत होत्या. दक्षिण भारत नव्हे तर संपुर्ण जग दैववाद व धर्मशास्त्राच्या अंधःकारमय खाईत लोटले गेले. संपूर्ण मानव जातीच्या जगण्याचे व जीवनशैलीचे संदर्भ धर्माधिष्ठित होते. परिवर्तनाचे सर्व सिध्दांत, तत्वचर्चा कालबाह्य झाली होती. तत्काळात संस्कृती हे संघर्षाचे, वाद प्रतिवादाचे प्रधान क्षेत्र होते. बसव काळातील राजकारण, धर्म, वर्ग, वर्णहित, सामाजिक अन्यायासाठी साधनसामुग्रीचे केंद्रीकरण करण्याच्या तत्वावर आधारित होते. त्याआधारेच राजकारण चालले होते. मानव जातीला अस्तास नेणाऱ्या परिस्थितीत सुधारणा करण्या विषयीची चर्चा बसवेश्वरांनी वचनातून केली.

बसवेश्वरांच्या समता तत्वाचा विचार करताना त्यांच्या वचन साहित्याला ध्यानात घ्यावे लागेल. परिवर्तनवादी युगाची नांदी ठरणाऱ्या विचारांची नोंद घ्यावीच लागेल. ती घेत असताना बसवेश्वरांनी भाषेचा वापर कोणत्या प्रयोजनाने केला हे ही विसरुन चालणार नाही. भाषा ही एका बाजूला तथ्य वर्णन करीत वास्तवाचे दर्शन घडवून देते तर दूसऱ्या बाजूला ती कांही संदेश देवून आपले दृष्टीकोण, जाणिवा आणि मानसिकतेची जडणघडण करीत आपले वर्चस्वही गाजवत असते. बसवकाळातील संस्कृत भाषेनेही समाजमनावर आपले निर्विवाद वर्चस्व निर्माण केले होते. त्या भाषेतून समाजाचे होणारे तथ्यनिर्देशक नकळत बहुजनांच्या जीवननिष्ठा बनल्या. संस्कृतच्या साह्याने लिहिलेल्या वैदीक ग्रंथानाच बहुजनांनी आपले विचार म्हणून स्विकारले. तीच त्यांची जीवनधारणा बनली होती. परिणामतः बसवेश्वरांनी संस्कृत या वैदीक भाषेऐवजी कन्नड या प्रादेशिक व बहुसंख्यांना समजणाऱ्या भाषेतून प्रस्थापीत समाजातील

ADARSH VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR Dist.Nanded

वर्णसंघर्ष व समतेची भाषा मांडली. तत्काळात एका बाजूला विषमतेचे विदारक स्थिती होत असताना आणि शुद्र, अस्पृश्य, वंचित यांच्या अस्तित्वासाठीचा लढा चालू असताना सामाजिक न्याय, समता ही ध्येये नजरेआड होवू लागली. पण बसवेश्वरांनी त्या संदर्भात मूलगामी चिंतन मांडून त्या तत्वांना कालबाह्य होवू दिले नाही. १२ व्या शतकाचे ओझे वागवत असताना न्याय आणि समता या दोन तत्वांना विसरुन चालत नाही. धार्मिक हक्क, सत्ता, संपत्ती, दर्जा व माणूस म्हणून प्रतिष्ठा ज्या समाजघटकांना नाकारली जाते व ज्यांना देव-धर्म, मोक्ष-स्वर्ग-नरक, पाप-पूण्य इत्यादीच्या बळावर दडपले जाते ते गुलामीत वागलेले वर्ण समतेच्या आक्रोश करीत. संघर्ष उभे करतात व प्रचलित व्यवस्था ढवळून काढतात. बसवेश्वरांनी १२ व्या शतकातील व्यवस्थेची विस्कटलेली घडीच्या पुनर्स्थापनेसाठी न्यायाच्या बाजूने संघर्ष उभा केला आणि परिणामी समतावादी नव्या व्यवस्थाचा जन्म झाला. समाज परिवर्तनाच्या समता व न्याय या दोन प्राथमिक व्यवस्था आहेत. व्यवस्था परिवर्तन हे जर जीवनाची अविभाज्य अंगे असतील तर समता हे सामाजिक, राजकीय व आर्थिक ध्येयाचे गृहीत म्हणून अंतर्धान पावणार नाही. म्हणून बसवेश्वरांनी १२ व्या शतकात केलेल्या समतेच्या विचाराची दखल घ्यावी लागेल. ही दखल घेताना आजच्या नव्या युगातील नव्या संदर्भाच्या अनुषंगाने त्याची पुन:पुन्हा मांडणी करावीच लागेल.

**महात्मा बसवेश्वर आणि आर्थिक समता**

महात्मा बसेवश्वरानी भारतीय समाजातील आर्थिक विषमतेस जवळून पाहिले होते. तत्काळात भारतीय समाजात श्रीमंत-गरीब अशी दरी होती. दारिद्र्य, गरिबी, बेकारी इत्यादी प्रश्न होते. लोकांची दैववादी प्रवृत्ती, लोकांना कर्तव्यशून्य बनवत होती समाजात अज्ञान होते. देव व धर्माच्या नावावर समाजाचे शोषण पुरोहित व ब्राह्मणामार्फत होत असत. वर्णाधिष्ठित समाजव्यवस्थेने व्यावसायिकतेचे निर्बंध लादले. उत्पादनाच्या प्रक्रियेचा वेग मंदावलेला होता. कारण समाजातील लोक ऐतखाऊ व आळशी होते. कष्ट न करता सुखवासी जीवन जगण्यास मिळावे. अशी प्रत्येक मानवाची धारणा होती. वर्ण व जातीव्यवस्थेने कांही जातीतील माणसांना जन्मतं:च कष्टाचे धनी बनवले होते. तर उच्चवर्णीय जातींना ऐतखाऊ बनवून त्यांच्यात शारिरीक कष्ट करणाऱ्यांविषयी घृणा निर्माण केली, तसेच उत्पादन निर्मितीत त्यांची शक्ती उपयोगात येत नव्हती. शिक्षण व्यवस्थाही याच विषमतायुक्त उत्पादनशक्तीचे समर्थन करणारी होती. बसवेश्वरांनी १२ व्या शतकातील विषमतेची चिकित्सा करताना आर्थिक विषमतेच्या प्रश्नांवर अधिक चिंतन केले. त्यांच्या या चिंतनातून आर्थिक विषमता सोडविण्या विषयीचे काही मूलगामी उपाय दिसून येतात. त्या उपायातून बसवेश्वरांच्या आर्थिक समतेत कायक वे कैलास, दासोह , सदाचार वे स्वर्ग - अनाचार वे नरक, अर्थार्जनाचे मार्ग व विनियोगाची पध्दत, करव्यवस्था, खाजगी संपत्तीस विरोध, शिक्षण, दारिद्र्याची उपाययोजना, धर्म व अर्थनितीचा संबंध हे प्रमुख घटक आहेत. कायक वे कैलास हा घटक चंगळवादी व ऐतखाऊ वृत्तीला नष्ट करुन श्रम हाच परमेश्वर आहे. हा विचार रुजवून उत्पादन वाढीच्या प्रक्रियेत सर्वांचा समान वाटा सिध्द करणारा आहे. स्वावलंबी मानव व समाजाची निर्मिती करणारा आहे. सर्वांमध्ये युगाची समता निर्माण करणारा आहे. दासोह यास गांधींच्या भाषेत विश्वस्ताची संकल्पना किंवा अपरिग्रहाचा

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

सिध्दांत म्हणतात. दासोहाच्या माध्यमातून साधी रहाणी व उच्च विचारसरणीचा विचार सर्व मानवात रुजवला. समाजातील श्रीमंत वर्गांनी स्वतःच्या गरजांचे नियंत्रण करुन आपल्या संपत्तीचा वापर इतर मानवांच्या गरजा भागविण्यासाठी करावा. अतिरिक्त धनसंचय किंवा खाजगी मालमत्तेच्या संग्रहाविरोधी दासोह एक भाष्य आहे. खाजगी मालमत्तेच्या विरुध्द बसवेश्वरांनी दिलेल्या संदेशाचा प्रबोधनात्मक आदेश आहे.

महात्मा बसवेश्वरांचा दासोह सिध्दांत तत्कालीन व आजच्याही शोषणास विरोध करुन आर्थिक समतेचा आशय स्पष्ट करणारा आहे. बसवेश्वरांच्या दासोह तत्वज्ञानास दान या अर्थाने संबोधून त्याची नकारात्मक उपेक्षा करण्याचा प्रयत्न कांही अभ्यासकांनी केला. पण बसवेश्वरांनी दासोहाची अंमलबजावणी व्यक्तिगत जीवनात करताना आपल्या मिळकतीतील जीवनावश्यक भाग आपणाकडे ठेवून इतर सर्व भाग समाजकल्याणासाठी वापरला. पण यात उपकाराची भावना न बाळगता कर्तव्य किंवा सामाजिक बांधीलकीचा विचार जोपासला. समाज कल्याणाची व धनवियोगाची ही अहिंसक रीत त्याकाळात दासोहातून सांगितली. जीचा वापर आजच्या धनदांडग्यांनी करावा. स्विस बँकेतील धन समाज कल्याणाच्या उपयोगी आणल्यास समाजातील असंख्य प्रश्न सुटतील. ही दासोहाची २१ व्या शतकातील प्रस्तुतता आहे. बसवेश्वरांनी या दासोह तत्वाच्या वृत्तीचा फैलाव कसा होईल याचा प्रयत्न केला. खाजगी मालमत्तेच्या संकल्पनेला विरोध करताना बसवेश्वर म्हणतात की, खाजगी मालमत्ता सामाजिक हिंसा, अनैतिकता, कलह, द्वेष निर्माण करते. त्यामुळे आर्थिक विषमतेची दरी वाढते. माणसे संपत्तीचा मुंगळा ढसल्याप्रमाणे मदमस्त होवून नाचायला लागतात. व्यवस्था ही अराजकतेची बनते. म्हणून समाजातील खाजगी मालमत्तेचे संचय करणाऱ्या आहे रे वर्गाने तिचा विनियोग दासोहाच्या साह्याने नाही रे वर्गाच्या कल्याणासाठी करावा. ज्यामुळे समाजात शांतता, सुख, ऐश्वर्य, बांधीलकी व अहिंसेचे वातावरण निर्माण होईल. तत्कालीन धनदांडग्यांना खाजगी संपत्तीचा वापर समाजकल्याणासाठी करण्यास प्रेरीत केले. उदा. काश्मिरचा राजा महादेव, मधुवरस, बलदेव इ. पण बसवेश्वरांनी समाजातील नाही रे वर्गांना आहे रे वर्गाची संपत्ती हिसकावण्याचा मार्क्सप्रणीत हिंसक संदेश दिला नाही. तसेच आजच्या राज्यासारखी हिंसक भूमिका राज्याने घ्यावी असेही विचार मांडले नाहीत. थोडक्यात दासोह व खाजगी मालमत्ताविरोधी विचार आर्थिक पुर्नरचनेचा मुख्य कार्यक्रम आहेत. तसेच दासोहातून संपत्ती व संपत्तीच्या किंवा उत्पादनाच्या साधनाचे न्याय वितरण व ते जनहितार्थ राबवण्याचा होता.

बसवेश्वरांनी समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी मानवी मूल्यावर आधारित अहिंसात्मक विचारप्रणाली व रचनात्मक कार्यक्रमावर भर दिला. समाज शोषण मुक्त झाल्याशिवाय खऱ्या अर्थाने समताधिष्ठित व अहिंसात्मक होत नाही. आर्थिक समता व अहिंसेचा परस्परसंबंध आहे. आर्थिक समतेचा प्रयत्न करताना श्रम व ऐतखाऊ वृत्तीमधील पारंपारिक संघर्ष नष्ट करणे होय. श्रीमंत लोकांना सर्वांच्या बरोबरीने आणणे. तसेच गरीब, वंचित यांना विकासासाठी पोषक वातावरण व संधी उपलब्ध करुन देणे. ज्यातून बहूजनांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल. श्रीमंतानी आपल्या कडील पैसा आणि राजकीय अभिजनांनी आपल्या सत्तेचा स्वइच्छेने त्याग करुन सत्ता व संपत्तीचा वापर सर्वांच्या कल्याणासाठी करावा. असे समाजातील श्रीमंत व

सत्ताधीश लोक करत नव्हते म्हणूनच तत्कालीन समाजात अत्याचार, अन्याय, शोषण, असमानतेचे प्रमाण वाढले होते. आज ही तीच अवस्था जगातील प्रत्येक राष्ट्रात आहे. त्यामुळे भारताचे माजी पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग म्हणतात, श्रीमंत-गरीब ही दरी भारतात दिवसेंदिवस वाढत आहे.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S
DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
* Dist.Nanded *

वसवेश्वरांच्या मते समता म्हणजे प्रत्येकाला आपल्या गरजा भागविण्यासाठी पुरेशी साधन सामुग्री उपलब्ध होणे. समाजातील धर्ममार्तंड व राज्यकर्त्या वर्गाकडून इतर वर्गाचे होणारं शोषण व वहुजनांचे अज्ञान व दैववादी वृत्ती शोषण व दारिद्र्यास कारणीभूत आहे. शोषणाची वृत्ती थांबविल्याशिवाय समतेचा विचार झिरपत नसतो. वहुजनांचे शोषण समाजातील पुरोहित, ब्राह्मण, सरंजामदार, अग्रहार प्रमुख व राजामार्फत होत असत. वहुजन समाजाचे कार्य वस्तुचे उत्पादन करणे पण वहुजनामार्फत झालेल्या उत्पादनाचा उपभोग मात्र समाजातील अभिजन वर्ग घेत असत. देव व धर्मांचा आधार घेऊन मोक्ष प्राप्ती, स्वर्गसुख, कैलास, पाप-पुण्य इ. दैवी संकल्पनांच्या माध्यमातून वहुजनांचे आर्थिक, बौध्दीक व मानसीक शोषण पुरोहितामार्फत होत असत. होम-हवन व यज्ञ पध्दतीतून दुसऱ्याच्या घरावर तुळशीपत्र ठेवून स्वत:चे घर भरण्याचा उद्योग तत्कालीन पुरोहितांचा होता. पण त्याच होम-हवनातील अग्नीने त्यांच्या घरास पेटले तर ते विझवण्यासाठी आचमनाचे पाणी किंवा वाळू टाका म्हणतात. अशी दुटप्पी भुमिका स्वीकारल्याचे सांगुन वसवेश्वरांनी पुरोहितशाहीचे पितळ उघडे केले. पुरोहितामार्फत होणाऱ्या शोषणास वहुजन समाजाव्यतिरिक्त राजाही बळी पडत असत. राजाकडून आपणास धन-धान्य व प्रशस्तीपत्र मिळून राजाश्रय मिळावा यासाठी राजाने ब्राह्मणांना दान द्यावे, यज्ञ करावा यामुळे राजावर कोणतेही संकट येणार नाही. तुझी किर्ती चारही दिशांना पसरत जाईल. असा दैववादी विचार रुजवत असत. वसवेश्वरांनी आर्थिक समता मांडताना शोषणाचा नायनाट महत्वाचा मानला. प्रत्येकाने कायक करुन वस्तुचे उत्पादन करावे. धनप्राप्ती करावी. यामुळे आपल्या जीवनावश्यक गरजा भागविण्याची क्षमता आपल्यात निर्माण होते. भीक मागण्याची वृत्ती नाहिसी होते. मूलभूत गरजांचा तुटवडा होणार नाही. वसवेश्वरांचा आर्थिक समतेचा विचार शोषणमुक्ती सोवत माणसाच्या परिपुर्ण विकासाचा विचार करतो.

तत्कालीन समाज व राज्य व्यवस्थेने आर्थिक समृध्दीच्या दृष्टिकोनातून मांडलेल्या किंवा केलेल्या उपायांची चिकित्सा करुन, वसवेश्वर म्हणतात की, राज्याचे कार्य कर वसूली करण्यासोवतच समाज व राज्यातील जनतेला कर भरण्याइतपत प्रथम सक्षम करावे. जनतेत सदाचारी, श्रमाविषयी आपुलकी किंवा श्रमाच्या महात्म्याचे महत्व पटवून सांगावे. यामुळे कर वसुली करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उत्पादनापेक्षा अधिक खर्च करण्याची गरज नाही. कारण कायकी व समाजनिष्ठ आणि राज्यनिष्ठ सदाचारी जनता उत्पादनाचे प्रमाण वाढल्यास स्वत:च कर आणुन तिजोरीत जमा करेल.

शिक्षणाच्या वंदीस्तीकरणास विरोध करुन अनुभवमंटपातून शिक्षणाचे सामाजिकरण किंवा सार्वत्रीकरण केले. शिक्षणामुळे मानवा-मानवात प्रेमाची, मानवतेची भावना निर्माण होते. शिक्षणाच्या प्रसाराने दासोहाचे आर्थिक समतावादी तत्वज्ञान रुजवणे सोपे जाते.

DEGLOOR COLLEGE, DEGLOOR
Dist.Nanded

आर्थिक समतेसाठी पैशांची निर्मिती किंवा वस्तूचे उत्पादन हे गरजेनुसार वस्तूच्या उत्पादनात गरजेशिवाय नफा हे सूत्र असेल तर शोषण वाढते. शोषण थांबविल्याशिवाय समता अवतरित होत नाही. आर्थिक क्षेत्रातील बहुजनांचे शोषण तत्कालीन समाजातील दोन वर्गाकडून होते. एक सामाजिक व धार्मिक पातळीवरील भट, भिक्षुक किंवा पुरोहित ज्याचा आधार देव, धर्म, स्वर्ग-नरक, पाप-पुण्य इत्यादी संकल्पना असतात. तसेच दुसरा वर्ग राजकीय व्यवस्थेच्या बुंध्यांशी चिकटलेला असतो, ज्यास महाजन, अग्रहार प्रमुख, सरंजामदार, प्रतिपाल व राजा इत्यादीचा समावेश असतो. बसवेश्वरांनी आपल्या वचनात देव व धर्मांच्या नावाने बहुजनांचे होणाऱ्या आर्थिक शोषणावर डोळसपणे टिप्पणी केली. तसेच राजेशाही व तिच्याशी नाळ जुळवून राहणाऱ्यांना संपत्तीच्या अपेक्षेचा ऐश झाल्यास ते कसे वागतात याचे वर्णन केले. बसवणांची आर्थिक समता फक्त आर्थिक प्राप्तीतील समानता नसून, माणसाच्या शोषणमुक्तीच्या व परिपूर्ण विकासाचा विचार आहे आर्थिक व्यवस्था राबवणाऱ्या तत्कालीन राज्यकर्त्या व समाजकर्त्यांना बसवेश्वरांनी काही मूलभूत प्रश्न विचारले असावेत. उदा. मानवाने धन का कमवावे ? किती कमवावे ? अर्थ व धर्म यांना मानवतावादी चेहरा असावा का ? राक्षसी ? इत्यादी या सर्व प्रश्नांना समजून घेवून वर्तन करणारी व्यवस्था या काळात नव्हती. म्हणून बसवेश्वरांच्या आर्थिक समतेस प्राधान्य देणाऱ्या ब्राह्मण्यवाद, पुरोहितशाही विरोधी विचार व खाजगी संपत्तीस विरोध करणाऱ्या विचारास समजून घ्यावे लागेल. पण याचा अर्थ असा नाही की बसवेश्वर ब्राह्मण व पुरोहित विरोधी होते. त्यांचा विरोध मानव किंवा व्यक्ती जात किंवा वर्गास नसून मानवातील वर्णनिहाय काटेकोरपणे वर्तन करणाऱ्या प्रवृत्तीला होता.

मानवी श्रमाचा वापर लोकहितार्थ व्हावा. माणसाला आळशी, कौशल्यहीन, श्रमविन्मुख आणि बेरोजगार बनवणाऱ्या व्यवस्थेचा विरोध केला. कारण त्यामुळे उत्पादन प्रक्रियेचा वेग वाढत नाही. चैनी व विलासी व्यवस्थेवर आधारीत व्यवस्थेत सर्वांनाच रोजगार करण्यासाठी बंधन केले जात नाही. अशी व्यवस्था समाजातील अल्पसंख्य वर्ग निर्माण करते. समाजातील असंख्यांना परंपरागत व्यवसायात गुंतवून ठेवणारी आणि सर्वांच्याच परिश्रमातून साकारणारी हस्तोद्योग, ग्रामोद्योगांसारखी व शेतीवर आधारीत उत्पादन व्यवस्था श्रेयस्कर मानली. बसवेश्वरांचा उत्पादनविषयीचा हा विवेक, बेरोजगारी शोषण व आर्थिक विषमता आणि श्रमविषयीच्या धार्मिक प्रभुत्वास विरोध करणारा आहे.

महात्मा बसवेश्वरांची आर्थिक समता तत्कालीन सरंजामदारी व्यवस्था व शोषणाचे उच्चाटन करणारी आहे. यात त्यांनी परंपरावादी मानवी संबंधाची नवीन निकषाच्या आधारे फेररचना केली. त्यासाठी शेतीपूरक योजना बनवल्या, शेती व्यवसायास आवश्यक कर्ज दिले, शिक्षण करून त्या सर्वच मानवांना पुरवण्याची ताकत आहे. पण त्यासाठी सर्वांनीच कायक करणे क्रमप्राप्त आहे. पण तत्कालीन अभिजनांनी स्वतः श्रम न करता बौध्दिक दृष्टीकोनाच्या जोरावर बहुजन समाजाला लुबाडले. स्वतःच्या ऐश्वर्याचा इमला बनवला. पण त्यासाठी बहुजनांच्या श्रमरुपी रक्ताचा चुना म्हणून वापर केला. तत्कालीन सरंजामदारी व राजेशाहीच्या

व्यवस्थेतील लोकांच्या धमण्यात जे रक्त वाहते आहे . ते बहुजनांच्याच श्रमाची देणगी आहे. पण समाजातील सर्वांनीच श्रम केले तर संपन्नतेचे रक्त बहुजनांच्याही धमण्यातून वाहू लागेल.

ADAT VYAPARI EDUCATION SOCIETY'S DEGLOOR COLLEGE, DEGLOOR * Dist.Nanded *

बसवेश्वरांचे वरील आर्थिक समते विषयीचे विचार पाहता त्यांनी तत्कालीन व आजच्याही भारतीय समाजातील धार्मिक शोषण, पुरोहितशाही, सरंजामदारी व्यवस्था, गरीब आणि श्रीमंत, कष्टकरी आणि ऐतखाऊ, वसाहतवादी, भांडवलदार, चंगळवादी कुपोषित यांच्यातील अंतर्विरोधाचे भान असल्याचे जाणवते. स्वत: जगणारा आणि इतरांना जगण्यास बंधन टाकणारा विचार व लोक कारणीभुत होते असे बसवेश्वरांना वाटत होते. म्हणून बसवेश्वरांनी उच्चवर्णीयांच्या ऐतखाऊ, आळशी, विलासी व श्रमविन्मुख वृत्तिस विरोध करुन सर्वांनीच श्रम करुन उत्पादन वाढीला हातभार लावावा असा कायक वे कैलास हा सिध्दांत मांडला. पण हे मांडताना समाजातील प्रस्थापित वर्ग तत्काळात विवेकशून्य होऊन संघर्ष करणार नाही याचीही दक्षता घेतली. बसवेश्वरांची आर्थिक समतेची संकल्पना वचन साहित्याच्या साह्याने व कृतिशीलतेतून समजून घ्यावी लागेल.

समाजातील शोषण विरोधी विचार टाळण्यासाठीच दासोहाची संकल्पना मांडली. बसवेश्वरांच्या मते दासोहाचा मुख्य आधार आर्थिक समता, समाज सेवा, सर्वांनाच जगण्यास उपलब्ध संपत्ती करुन देणे, तसेच समाजातील श्रीमंत-गरीब दरी दुर करणे, अभिजनांच्या चंगळवादास नाकारणे, समाजातील सर्वच वर्गाचे उदात्तीकरण करणे होय. तत्कालीन व आजच्या बहुसंख्य लोकांचे कल्याण साधण्याची ताकत कायक वे कैलास आणि दासोह सिध्दांत आहे.

बसवेश्वरांची आर्थिक समतेची कल्पना कायक, दासोह उत्पादनाशी निगडीत विचार पैशाचा विनियोग इत्यादीच्या साह्याने समजून घ्यावी लागेल. शोषणमुक्त समाज निर्मितीचे महात्मा गांधी, कार्लमार्क्स व इतर आधुनिक समाजवादाचे स्वप्न बसवेश्वरांना मान्य होते. पण समाजवाद्याप्रमाणे समाजात वर्णातीत संघर्ष निर्माण करुन आर्थिक समता प्रस्थापित होऊ शकते हे बसवेश्वरांना मान्य नाही. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या प्राथमिक व मुलभूत गरजांची पुर्तता झाल्यावरच संपन्नतेचा ध्यास आपण घेवू शकतो. कारण अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य व रोजगार या प्राथमिक गरजांच्या पुर्ततेशिवाय मानवाचे खरे सबलीकरण होत नाही. आर्थिक विकासाच्या लाभाचे वाटप किंवा वितरण समता व न्याय पध्दतीने व्हावे. ज्यामुळे सर्वांच्या प्राथमिक गरजा पूर्ण होतील. प्रत्येक व्यक्तीला उत्पादक या नात्याने श्रम करणे बंधनकारक ठरेल. प्रत्येकाने श्रम करुन वस्तूच्या उत्पादनवाढीत सहभाग नोंदवल्याने शोषण व विषमता रहाणार नाही. समृध्दीनंतरही श्रमप्रतिष्ठेचा आग्रह बसवेश्वरांनी धरला. कारण बसवेश्वरांच्या संपूर्ण अर्थविषयक चिंतनात श्रमाला फार महत्त्व आहे. कारण श्रम हे नुसतेच उत्पादन मूल्य नाही. तर ते उपासना मूल्य किंवा जीवनाला सुखकारक करण्याचा मार्ग आहे. कायकास बसवेश्वरांनी उपासना मूल्य प्राप्त करुन दिल्यामुळेच कल्याणमध्ये श्रमिकांच्या संस्कृतीचा उदय झाला. आर्थिक समता आणण्याचा कायक वे कैलास हा एक महत्वाचा मार्ग बसवेश्वर सांगतात कारण जीवन जगण्यासाठी किंवा पोटासाठी लागणाऱ्या वस्तूंचे उत्पादन

सर्वांनीच श्रमाच्या साह्याने केले तर समाजात दारिद्र्य व असंतोष निर्माण होणार नाही. गुलामगीरीची व्यवस्था नष्ट होईल. समाजात संतोष व आरोग्य नांदेल. तत्कालीन चतुर्वर्ण व्यवस्था व जातीयतेने एका विशिष्ट वर्गाला स्वइच्छेने परिश्रम करण्यापासून दूर ठेवले. तर कांही जणांना पोटासाठी श्रमाची सक्ती करुन त्यांना गुलामगिरीत ठेवले. बसवेश्वरांना हे अमान्य होते. म्हणून त्यांनी शरीरश्रम करणे प्रत्येक मानवाचे कर्तव्य मानले. स्वकष्टाने मिळविलेल्या संपत्तीवरच आपली मालकी असावी इतर संपत्तीवर समाजाची मालकी असावी. तत्कालीन व अन्यथा श्रीमंत किंवा विलासी वर्ग श्रम न करता कमावलेल्या संपत्तीचा अनिर्बंध भोग घेत असत. तो श्रमाची प्रतिष्ठाही घालवतो. कारण दिवसभर कायक केल्याने भूक लागते. खाल्लेले पचते. शिवाय चैनी, विलासी, ऐतखाऊ जीवनातून येणारा लठ्ठपणा, बी.पी. शुगर इत्यादी त्रासदायक रोग होणार नाहीत. खाल्लेले पचावे म्हणून व्यायाम करण्यापेक्षा सर्वांनीच शारिरीक श्रम करणे योग्य. कायकाचे तत्व सर्वांनीच अंगीकारले तर अमानवीय असा श्रेष्ठ-कनिष्ठ भाव नष्ट होईल.

**संदर्भग्रंथ**


१. समाजसुधारक महात्मा बसवेश्वर - डॉ.अशोक मेनकुदळे.
२. अनुभवमंटप - संपादक - किरण कोरे.
३. बसव सिध्दांत - संपादक - प्रा. म.इ.तंगावार व बाबुराव माशाळकर.
४. बसव तत्वचिंतन - संपादक - प्रा. म.इ.तंगावार व बाबुराव माशाळकर.
५. बसव पथ द्वैमासिक - संपादक - बाळासाहेब पाटील.
६. युगप्रवर्तक महात्मा बसवेश्वर - संपादक - प्रा.भिमराव पाटील व प्रा.करजकर.
७. वीरशैव व इतर धर्म आणि समाज - डॉ.सुर्यकांत घुगरे.
८. समाज परीवर्तनाचा महामेरु - डॉ.सचिदानंद बिचेवार.



**- प्रा.डॉ.रत्नाकर बाबुराव लक्षटे**
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
देगलूर महाविद्यालय देगलूर
मो नं. 9423439276


❁❁❁


Dr. Anil Chidrawar
I/C Principal
A.V. Education Society's
Degloor College, Degloor Dist.Nanded